वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मानपाडा पोलीस स्टेशन * डोंबिवली (पू.) *

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** मानपाडा **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0679 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/09/2022 19:52 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Date From (दिनांक पासून):** 02/05/2022
**Date To ( दिनांक पर्यंत):** 02/05/2022
**Time Period (कालावधी):** पहर 1
**Time From (वेळेपासून):** 00:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 00:00 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 01/09/2022 **Time (वेळ):** 18:30 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 044 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/09/2022 19:26 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मानपाडा पोलीस स्टेशन डोबिंवली पुर्व

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पोलीस निरीक्षक सुरेश गणपत चोपडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1972 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे,मानपाडा ,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे,मानपाडा ,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पोलीस नाईक नितीन राठोड | | | 1. मानपाडा पोलीस स्टेशन,डोंबिवली पुर्व , मानपाडा ,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी सुरेश गणपत चोपडे, पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे. समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,
मी वरील प्रमाणे असून अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे कार्यरत आहे. दिनांक 01/05/2022 रोजी आमचे वरिष्ठानी आदेशीत केल्याप्रमाणे
आम्ही तक्रारदार श्री.समीर यशवंत भोईर, वय.37 वर्षे , धंदा-ठेकेदार, राह. श्री साई अपार्टमेंट, रुम नं.201,ओमःकार नगर, आजदे गाव,
डोंबिवली, पुर्व. जि. ठाणे यांना फोन करुन त्यांचे तक्रारीबाबत प्राथमिक माहिती घेवून दिनांक 02/05/2022 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे
अंतर्गत राबोडी कार्यालयात हजर राहणेकामी कळविले. त्याप्रमाणे आम्ही पुढील कारवाई करीता अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात राखीव
असेलेले ठाणे महानगरपालिका, ठाणे कडील पंच साक्षीदार श्री. संतोष लहाने,लिपीक, व श्री. नागराज चव्हाण, लिपीक यांना दि.02/05/2022
रोजी सकाळी 10.00 वाजता अँन्टी करप्शन ब्युरो,ठाणे अंतर्गत राबोडी कार्यालय, ठाणे येथे हजर राहण्याची समज दिली.
तक्रारदार श्री.समीर यशवंत भोईर व त्यांची पत्नी समीक्षा हे त्यांचे लेखी तक्रारीसह दिनांक 02/05/2022 रोजी सकाळी 09:30वा. आमचे
कार्यालयात हजर झाले. त्याचवेळी पंच साक्षीदार श्री. संतोश लहाने,लिपीक, व श्री. नागराज चव्हाण, लिपीक हे दोन्ही पंच 10.05 वाजता
आमचे कार्यालयात समक्ष हजर राहिले. त्यावेळी आमचे कार्यालयात समक्ष हजर असलेले तक्रारदार श्री. समीर भोईर, त्यांची पत्नी श्रीमती
समीक्षा भोईर व सापळा पथकातील अंमलदारांची ओळख करुन दिल्यावर आमचे सांगणे प्रमाणे तक्रारदार श्री. भोईर यांनी दोन्ही पंचांना त्यांची
तक्रार समजावून सांगितली.
तक्रारदार श्री.समीर यशवंत भोईर व त्यांची पत्नी यांचे विरुध्द मानपाडा पोलीस स्टेशन गुन्हा रजि क्रमांक.48/2022 भा.दं.वि.कलम
406,34 प्रमाणे दि.26/1/2022 रोजी गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयात तक्रारदार व त्यांची पत्नी यांची जामीनावर मुक्तता झाली आहे.
गुन्हयाचे तपासिक अंमलदार पो.उप.निरीक्षक मुसळे यांनी तक्रारदार यांना गुन्हयात मदत केली असुन व यापुढेही मदत करणार आहेत याकरीता
ते तक्रारदार यांचेकडे 50,000/-रुपयाची मागणी करीत आहेत. तरी त्यांचेवर कारवाई व्हावी अशा मजकुराची तक्रारदार यांची लेखी तक्रार
आहे.
तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने पडताळणी करुन योग्यती कारवाई करणेकामी आंम्ही, तसेच दोन्ही पंच, पडताळणी
पथकातील सपोउपनि/सोंडकर, पोना/शिंदे असे आवश्यक त्या साधन सामुग्रीसह व्हॅगनर कार क्र. MH46/AL/8683 या खाजगी वाहनाने व
तक्रारदार हे त्यांचे ताब्यातील खाजगी वाहनाने ठाणे कार्यालयातुन निघुन एम.आय.डी.सी.,गणेश मंदिर जवळ,बी.जे.पी कार्यालया जवळील
मोकळे मैदानात, डोंबिवली,पुर्व, जि.ठाणे येथे पोहचलो.
त्यानंतर तक्रारदार श्री. समीर भोईर यांचे तक्रारीचे अनुशंगाने पडताळणी करण्याकरीता आंम्ही तक्रारदार श्री. समीर भोईर यांचेकडे डिजीटल
व्हाईस रेकॉर्डर देवून, पंच श्री.नागराज चव्हाण यांचे समवेत लोकसेवक मुसळे व राठोड यांना भेटण्यास मानपाडा पोलीस स्टेशन येथे पाठविले.

तक्रारदार हे त्यांची पत्नी व पंच नं. 1 श्री. नागराज चव्हाण यांचेसह त्यांचे खाजगी वाहनाने मानपाडा पोलीस ठाण्यात लोकसेवक यांना भेटण्यासाठी गेले. त्यावेळी पोलीस ठाणे अंमलदार कक्षामध्ये कर्तव्यावर हजर असलेले पोलीस कर्मचारी यांना हजेरी करीता आले असलेबाबत सांगितले. त्यावेळी तेथील पोलीस कर्मचा-याने, ''मुसळे साहेबांकडे आहे प्रकरण ना. अलग अलग जामीन भेटला ना तुमचा? वगैरे असे विचारुन '' साहेबांना सांगायच चार्जशिट लावा लवकर'' असे सांगितले त्यावर तक्रारदार यांनी यापुर्वी त्यांना सांगितले असल्याबाबत सांगितले असता सदर पोलीस कर्मचा-यांने '' साहेबांना जावून भेट...कडकडून भेटा....हार्ड कॅश दे लगेच चार्ज शिट जाते'' असे बोलुन मुसळे साहेबांना काहीतरी रक्कम दिल्यावर चार्जशिट लवकर जाईल असे तक्रारदार यांना सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी ''सर निघु, जावू का?..'' असे विचारले असता सदर पोलीस कर्मचाÚयांने ''तुझा मॅटर मुसळे साहेबांकडे आहे ना?.. मुसळे साहेब नाही वाटतं '' असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी राठोड आहेत का याबाबत विचारणा केली असता त्यांनी राठोड आले असल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार हे त्यांचे पत्नी सह पोलीस स्टेशनचे आतील अधिकारी कक्षात पोलीस कर्मचारी राठोड यांना भेटले. त्यावेळी राठोड यांनी तक्रारदार व त्यांचे पत्नीस एकशे सात प्रमाणे कारवाई करीता ए.सी.पी. सरांकडे पाठवावयाचे असल्याबाबत सांगितले तक्रारदार यांनी त्यांचे मुलीचा रिझल्ट असल्याने थोडयावेळात परत येतो असे सांगुन निघताना तक्रारदार यांनी '' त्या दिवशी सकाळी आलो तर साहेब बोलले रात्री ये ...मी रात्री आलो तर काय बोललेच नाय.'' असे सांगितले असता. पोलीस कर्मचारी राठोड यांनी ''ते यायला पण मागत नाय'' असे सांगितले त्यावर तक्रारदार यांनी '' साहेबांना मी बोललो की पन्नास जरा जास्त होतात..काय तरी कमी करा....तर करतो बोलले...आता माझी कंडीशन डावून झालेय...पन्नास आता नाही जमणार..आता मागे इतके दिवस तिकडे होतो..साहेबांना भेटायच तर..'' असे सांगितले असता राठोड यांनी तक्रारदार यांना त्यांचे काम करुन परत येण्यास सांगितले. सदरचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत झालेले असुन त्याबाबतची स्क्रिप्ट पडताळणी पंचनाम्यामध्ये सामाविष्ट आहे.

सदर पडताळणीचे वेळी तक्रारदार यांचे लोकसेवक मुसळे यांचेशी संभाषण झालेले नसल्याने तसेच पोलीस कर्मचारी राठोड यांनी देखील लाचेच्या अनुषंगाने संभाषण न केल्याने आंम्ही तक्रारदार यांचेकडे पुन्हा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर देवून त्यांना त्यांची पत्नी व पंच श्री. चव्हाण यांचेसह त्यांचे खाजगी कारने लोकसेवक यांना भेटण्याकरीता मानपाडा पोलीस स्टेशन येथे पाठविले. त्यावेळी लोकसेवक पोउपनि मुसळे हे पोलीस स्टेशन मध्ये हजर होते. तक्रारदार भोईर यांनी मुसळे यांना ''साहेब बोलाना त्या दिवशी काय बोलले नाही तुम्ही,...त्या दिवशी तुंम्ही काय बोललेच नाही.....त्यावेळी लोकसेवक मुसळे, यांनी '' काय बोलु मी?'' असे विचारले असता तक्रारदार यांनी,''काय कमी जास्त काय बोललेच नाय तुम्ही....'' त्यावेळी लोकसेवक मुसळे म्हणाले,'' मी काय बोलु..मी काय बोलणार नाही...त्या दिवसा पासुन मी विषयच बंद केला बस..'' त्यावेळी तक्रारदार हे '' पेमेंन्ट अटकलेला ना बाकी नाही ओ तसा.... पंन्नास पण जास्त होतात ना साहेब न तसा....काही कमी करा ना पन्नास मधून '' असे बोललो असता लोकसेवक मुसळे यांनी,''तुला काय करायच ते कर...मी काहीच बोलण करणार नाही मी त्यानंतर बोललो का त्यानंतर मी विषयच बंद केला....माझा कर्तव्य जेवढे होते तेव्हडे केले आहे...'' असे बोलुन लाचेच्या व्यवहाराबाबत अधिक बोलण्याचे टाळले, त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांना हजेरी करीता आल्यावर कामावर जायला मिळत नाही दिवस फुकट जातो त्यामुळे लवकर चार्जशिट दाखल करणेबाबत विनंती केली. त्यानंतर लोकसेवक मुसळे यांचे रायटर पोलीस कर्मचारी राठोड हे तक्रारदार यांना बाहेर घेवुन गेले व त्यांनी तक्रारदार यांना,''काय तरी देवून टाक ....'' असे बोलुन तक्रारदार यांना निश्चित रक्कम न सांगता लाचेची मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी,''चालेल ना?'' असे विचारले असता लोकसेवक राठोड यांनी ''काय करायच सांग?'' असे बोलुन लाचेच्या रक्कमेबाबत प्रतिप्रश्न केला. त्यावेळी तक्रारदार हे राठोड यांना,''साहेब काय बोलतच नाय...साहेब काय बोलतच नाय'' असे राठोड यांना बोलले असता पोलीस कर्मचारी राठोड यांनी,''किती आहेत......साहेब बोलतील कमी आहेत.... पण कमी किती आहेत बोल ना...'' असे तक्रारदार यांचेकडे किती रक्कम आहे असे विचारले त्यानंतर त्यांनी तक्रारदार व त्यांचे पत्नीस प्रतिबंधक कारवाईचे कामकाजा करीता दुसरे कक्षात आणले तेथे प्रतिबंधक कारवाई संदर्भातील कागदपत्रे पुर्ण केल्यावर तक्रारदार भोईर यांनी पुन्हा राठोड यांना ''तुम्ही काय तरी बोला...काय करायचा असला तर...सांगातर खर.. काय असेल तर इकडे येवून बोला साईटला...'' असे बोलुन लाचेची रक्कम सांगणेबाबत राठोड यांना सांगितले असता राठोड यांनी ''मी बोललो होतो, तु सांगना साहेबाला .......अस बोलतो म्हणुन...'' असे बोलुन राठोड यांनी यापुर्वी सांगितलेली रक्कम मुसळे यांना सांगण्यास तक्रारदार यांना सांगितले, त्यानंतर तक्रारदार यांनी पोलीस कर्मचारी राठोड यांना ''मी काय बोललो साहेब...थोडे जास्त होतात म्हणुन बोललो काही तरी कमी करा..मला डिस्काऊंट दया..वाटलास तर पुढच्या महिण्यात मी अजुन देतो...पण काय कंडिशन डाऊन आहे माझी..तुम्ही अमाऊंट सांगा मला...'' असे बोलुन पुर्वी मागितलेली रक्कम कमी करुन निश्चित रक्कम सांगण्याबाबत बोलने केले, त्यावेळी राठोड यांनी,''तु सांग मी बोलतो साहेबाला, असं-असं बोलतोय म्हणुन..'' त्यावर तक्रारदार यांनी राठोड यांनाच मुसळे साहेबांशी बोलण्यास सांगितले, त्यावर लोकसेवक राठोड यांनी ते विचारण्यास गेले तर आधी सांगितले होते तरी पुन्हा कमी करायला आले असे साहेब बोलतील असे तक्रारदार यांना सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची परिस्थिती ठिक नसल्याचे सांगून लोकसेवक राठोड यांना '' तुम्ही तर बोला'' असे बोलुन लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता लोकसेवक राठोड यांनी ''चाळीस पर्यत कर..'' असे बोलुन चाळीस हजार रुपये अशी निश्चित रक्कम सांगितली त्यावर सरदची रक्कम केव्हा दयावयाची याबाबत विचारले असता लोकसेवक राठोड यांनी ''बोलावतो तुला...दोन तिन दिवसात...'' असे सांगितले त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक राठोड यांचेकडुन त्यांचा मोबाईल फोन नंबर घेतला व नंतर फोन करतो असे सांगितले.

वरील प्रमाणे झालेल्या पडताळणी दरम्यान तक्रारदार यांचेकडे लोकसेवक पोलीस कर्मचारी राठोड यांनी ''काय तरी देवून टाक'' असे बोलुन ''चाळीस पर्यत कर.'' बोलुन चाळीस हजार रुपये लाचेची मागणी करुन सदरची रक्कम दोन-तीन दिवसात देण्यास सांगितली असल्याचे पडताळणी दरम्यान स्पष्ट झाले.

पडताळणी दरम्यान तक्रारदार यांचे पोलीस स्टेशन मधील ठाणे अंमलदार कक्षातील पोलीस अंमलदाराशी, लोकसेवक पोउपनि मुसळे यांच्याशी तसेच पोलीस कर्मचारी लोकसेवक राठोड यांचेशी झालेले संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले असुन, त्याची स्क्रिप्ट पडताळणी पंचनाम्यात समाविष्ट आहे. सदर कारवाईचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

वरील पडताळणी नंतर तक्रारदार यांनी ते त्यांचे मुलीच्या अॅडमिशन प्रक्रियेत व्यस्त आहेत तसेच घरगुती खाजगी कारणास्तव बाहेरगावी जाणार असल्याने त्यांना आठवडाभर वेळ नाही असे पंचासमक्ष आंम्हास सांगितले. त्यावेळी आम्ही त्यांना सापळा कारवाईचे काम लवकर करणे गरजेचे असल्याची जाणीव करुन दिली. परंतु तक्रारदार यांनी त्यांचे काम महत्वाचे असल्याचे सांगितले, त्यावेळी लोकसेवक मुसळे अथवा पोलीस कर्मचारी लोकसेवक राठोड यांनी त्यांना फोन केल्यास तात्काळ आमचेशी संपर्क करणेस सांगितले.

त्यानंतर बराच कालावधी होवुनही लोकसेवक मुसळे अथवा पोलीस कर्मचारी लोकसेवक राठोड यांनी तक्रारदार यांना संपर्क केला नाही. त्यामुळे तक्रारदार हे त्यांचे पत्नीसह हजेरी करीता मानपाडा पोलीस स्टेशन येथे गेले असता पोउपनि मुसळे व पोलीस कर्मचारी राठोड हे रजेवर गेले असल्याचे समजले. तक्रारदार यांनी त्याबाबत आंम्हास माहिती दिल्यावर आंम्ही लोकसेवक रजेवरुन पुन्हा हजर झालेवर कळविण्यास सांगितले. त्यानंतर आंम्ही सतत तक्रारदार यांचे संपर्कात होतो, परंतु ते आम्हांस भेटण्याचे व आमचा फोन कॉल उचलण्यास टाळत असल्याचे आम्हांस आढळुन आले तसेच यातील लोकसेवक हे कर्तव्यार हजर झाले असल्याबाबत आम्हांस माहिती मिळाल्याने आंम्ही दिनांक 02/05/2022

रोजीच्या पडताळणीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करावयाची असल्याने तक्रारदार श्री. भोईर यांना दिनांक 21/06/2022 रोजी आमचे कार्यालयात समक्ष हजर राहणे बाबत लेखी समजपत्र पाठविले. परंतु तक्रारदार हे आमचे कार्यालयात हजर राहिले नाहीत. त्यामुळे आम्ही पुन्हा तक्रारदार यांना त्यांचे मोबाईल फोन वर वारंवार संपर्क साधला असता दिनांक 29/06/2022 रोजी तक्रारदार श्री.समीर भोईर हे त्यांचे पत्नीसह आमचे कार्यालयात समक्ष हजर झाले त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडे केलेल्या चैकशीत त्यांनी सांगितले की ते एका सोमवारी हजेरी करीता मानपाडा पोलीस स्टेशन मध्ये गेले होते तेव्हा त्यांना मंगळवारी त्यांचे फोटो घेवून येण्यास सांगितले, ते मंगळवारी पोलीस स्टेशन मध्ये गेले असता पोउपनि मुसळे हे त्यांना बघुन तेथुन निघुन गेले व पोलीस कर्मचारी नितीन राठोड यांनी देखील त्यांचेशी बोलण्याचे टाळले. त्यानंतर दुसÚया सोमवारी तक्रारदार हे हजेरी करीता मानपाडा पोलीस स्टेशन येथे गेले असता त्यांचे शर्टाला असलेला पेन पाहुन मुसळे साहेबांनी व राठोड यांनी त्यांना पेन गाडीत ठेवुन येण्यास सांगितले. त्यानंतर दिनांक 20/06/2022 रोजी तक्रारदार हे त्यांचे पत्नीसह मानपाडा पोलीस स्टेशन येथे गेले असता पोलीस कर्मचारी राठोड यांनी तक्रारदार यांना त्यांचे विरुध्द दाखल गुन्हयातील दोषारोप पत्र मा.न्यायालयात पाठविले असल्याचे सांगितले व ते निघुन गेले. यावरुन लोकसेवक हे आम्हा पती पत्नीस पाहुन भेटण्यास टाळाटाळ करतात तसेच लोकसेवक यांनी आम्हा पती पत्नी विरोधात दाखल गुन्हयातील दोषारोप पत्र पाठविले असल्याने आता आम्हाला पोलीस स्टेशनला हजेरीला जावे लागणार नाही. त्यामुळे आता आम्हांला कोणताही त्रास नाही. आम्हां पती पत्नी विरुध्द गुन्हा दाखल झाल्याने आमची मानसिक स्थिती बरोबर नाही त्यामुळे आम्ही दिलेल्या तक्रारीबाबत पुढे काय कारवाई करु नये असे तक्रारदार यांनी सांगितल्याने तसा तक्रारदार यांचा सविस्तर जबाब नोंदविण्यात आला आहे.

तरी यातील तक्रारदार श्री. समीर यशवंत भोईर यांनी त्यांचे व त्यांची पत्नी सौ. समिक्षा यांचे विरुध्द मानपाडा पोलीस स्टेशन गुन्हा रजि क्रमांक. 48/2022 भा.दं.वि.कलम 406,34 प्रमाणे दि.26/1/2022 रोजी गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयाचे तपासी अंमलदार पोउपनि मुसळे यांनी त्यांना गुन्हयात मदत केली व यापुढे देखील मदत करणार आहे असे सांगुन तक्रारदार यांचेकडे 50,000/- रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत अँन्टी करप्शन ब्युरो,ठाणे कार्यालयात दिलेल्या लाचेच्या मागणीचे तक्रारीचे अनुशंगाने दिनांक 02/05/2022 रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक मुसळे यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेच संदर्भात कोणतेही भाष्य केलेले नाही नाही, परंतु लोकसेवक पोउपनि मुसळे यांचे रायटर म्हणुन काम करणारे लोकसेवक नितीन राठोड, पोलीस नाईक/मानपाडा पोलीस स्टेशन, ठाणे यांनी तक्रारदार भोईर यांचेशी तडजोड करुन शेवटी 40,000/-रुपये लाचेची मागणी केली असल्याचे स्पष्ट झाल्याने लोकसेवक पोलीस नाईक, नितीन राठोड, नेमणुक मानपाडा पोलीस स्टेशन, ठाणे यांनी प्रस्तुत प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 (संषोधन 2018) चे कलम 7 प्रमाणे दंडनिय अपराध केला असून त्याचे विरुध्द माझी सरकार तर्फे फिर्याद आहे .

समक्ष
हे लिहुन दिले

पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

(सुरेश चोपडे)

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): shekhar ramdas bagade(I (Inspector)) / **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / Informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

PI ACB Thane

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

PSI

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): shekhar ramdas bagade
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

मानपाडा पोलीस स्टेशन
डोंबिवली (पू.)

**Attachment to Item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**